फुलशेती

# ‘गोल्डन रॉड डेझी’ची अशी करा लागवड




**नीलिमा गोबाडे**
(मो.नं. ९८२२३४७०५३)
**निर्मला ठोके**
**गौरव घोरमाडे**
(पीएच.डी. स्कॉलर)
**अंकित खेडीकर**
वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी






गोल्डन रॉड डेझी कोणत्याही प्रकारच्या म्हणजेच हलक्या, मध्यम तसेच पाणथळ जमिनीत चांगल्याप्रकारे फुलविता येते. उत्तम फुलांसाठी आणि लांब दांड्यासाठी मध्यम, सुपीक आणि पाण्याचा योग्य निचरा असणारी जमीन अतिशय चांगली असते. सर्व ऋतूतील हवामान झाडांच्या वाढीसाठी तसेच फुले येण्यासाठी योग्य ठरते.

**गो**ल्डन रॉड म्हणजेच 'सॅलिडॅगो डेझी' ही गोल्डन शॉवर किंवा मराठीत **सोनतुरा** या नावाने देखील ओळखली जाते. लग्न, वाढदिवस आणि इतर समारंभामध्ये पुष्पहार, पुष्पगुच्छ देण्याची पद्धत प्रचलित होऊ लागली आहे. आकर्षक रंग, झुपकेदारपणा, लांब आणि सरळ दांडा आणि जास्त दिवस टिकून राहण्याची क्षमता या सर्व गोष्टींमुळे पुष्परचनेतही या फुलांनी मानाचे स्थान पटकावले आहे.

या फुलांबाबत महत्त्वाची गोष्ट म्हणजे लांब दांड्यावर असणारी गोल्डन रॉडची फुले एकाच वेळी उमलत नसल्यामुळे आणि फुलांचे उमलणे अनेक दिवस सुरू राहत असल्यामुळे, कित्येक दिवस फुलांचा हा ताटवा शोभा देत राहतो. विविध आकार आणि रंगांनुसार डेझी समूहातील इतर प्रकार उदा. मायचलमस डेझी, आफ्रिकन डेझी, इंग्लिश डेझी, स्पॅन सिलव्हर डेझी, इत्यादी पांढरी, लालसर, निळसर, नारिंगी गुलाबी, पिवळी, आकाशी अशी आकर्षक फुले देतात.



**जमीन, हवामान आणि हंगाम** : गोल्डन रॉड डेझी कोणत्याही प्रकारच्या म्हणजेच हलक्या, मध्यम तसेच पाणथळ जमिनीत चांगल्याप्रकारे फुलविता येते. उत्तम फुलांसाठी आणि लांब दांड्यासाठी मध्यम, सुपीक आणि पाण्याचा योग्य निचरा असणारी जमीन अतिशय चांगली असते. सर्व ऋतूतील हवामान झाडांच्या वाढीसाठी तसेच फुले येण्यासाठी योग्य ठरते. त्यामुळे वर्षभरात कधीही गोल्डन रॉडची लागवड करता येते. सूर्यप्रकाश आणि विरळ सावलीतसुद्धा झाडांची वाढ चांगली होते.

**पूर्वमशागत आणि अभिवृद्धी** : गोल्डन रॉडच्या व्यापारी तत्त्वावर लागवडीसाठी जमिनीची नांगरट व कुळवणी करून माती मोकळी करावी. काडी-कचरा वेचून जमीन लागवडीसाठी तयार करावी. जमीन तयार करताना त्यात हेक्टरी १५ ते २० टन चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट खत मिसळावे. शेणखताची कमतरता असल्यास लागवड करण्याच्या जमिनीत तागासारखी हिरवळीची खते पेरून फुले येण्याच्या अगोदर जमिनीमध्ये पावसाळ्यात गाडून टाकावे. ताग कुजल्यानंतर लागवडीसाठी जमीन तयार झाल्यानंतर ३ X २ मीटर आकाराचे सपाट वाफे करून त्यामध्ये ५० X ५० सें.मी. किंवा ४० X ३० सें.मी. अंतरावर लागवड करावी. गोल्डन रॉडची अभिवृद्धी जुन्या झाडांना फुटलेल्या फुटव्याद्वारे करतात.

**आंतरमशागत** : गोल्डन रॉडचे झाड काटक, चिवट तसेच रोग आणि किडींना कमी प्रमाणात बळी पडणारे आहे. लागवडीनंतर आवश्यकतेनुसार खुरपणी करून पीक तणविरहीत ठेवावे. हिवाळ्यात ८ ते १० दिवसांच्या अंतराने तर उन्हाळ्यात ५ ते ६ दिवसांनी जमिनीच्या मगदुराप्रमाणे पिकास पाणी द्यावे.

**खते** : गोल्डन रॉड हे खताला उत्तम प्रतिसाद देणारे पीक आहे. गोल्डन रॉडच्या रोपांची वाढ जलद होऊन फुलांचा दर्जा उत्तम येण्यासाठी प्रतिहेक्टरी १५० किलो नत्र, १०० किलो स्फुरद आणि १०० किलो पालाश द्यावे. अर्धे नत्र आणि संपूर्ण स्फुरद व पालाश खते लागवडीपूर्वी जमिनीत द्यावीत. बाकी राहिलेली नत्राची अर्धी मात्रा समान भागात विभागून पहिल्या हप्त्यानंतर चार महिन्यांच्या अंतराने दोनदा द्यावी.

**कीड आणि रोगांचे असे करा नियंत्रण–**

**कीड** : या फुलझाडांवर मावा, तुडतुडे, लष्करी अळी या किडींचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. या किडींच्या नियंत्रणासाठी डायमेथोएट, कार्बारिल, मॅलॅथिऑन, मोनोक्रोटोफॉस या औषधांचे फवारे योग्य ते प्रमाण घेऊन आलटून- पालटून फवारावेत.

**रोग** : करपा रोगाचे तांबडे- काळे डाग पानांवर, खोडांवर व फुलांवर पडतात. या रोगाचा प्रादुर्भाव दमट व पावसाळी हवामानात मोठ्या प्रमाणावर आढळतो. रोगाचा प्रसार झाडाच्या शेंड्याकडे पसरत जाते. या रोगाच्या नियंत्रणासाठी ०.१% कार्बेन्डेझिम किंवा ०.२% डायथेन एम - ४५ या बुरशीनाशक औषधांची १० ते १५ दिवसांच्या अंतराने फवारणी करावी.

**भुरी** : पानांवर, फुलांवर पांढऱ्या रंगाचे ठिपके आढळतात. नियंत्रणासाठी गंधक ३०० मेशची धुरळणी किंवा फवारणी करावी. १०-१५ दिवसांच्या अंतराने फवारणी करणे अत्यावश्यक असते. ■